# सहसंचालक, तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय,

## शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-atij_droamt@Sancharnet.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५५१३८८


---

फॅक्सद्वारे
तात्काळ

क्र.विकाअ/शिक्षण/पदविका/२००८/ ९५३६
दिनांक :- २५.६.०८

प्रति,

प्राचार्य,

१. विनाअनुदानित तंत्र निकेतने, डॉ.पं.दे, अमरावती, डॉ.पं.दे.महिला अमरावती बडनेरा, धामणगांव रेल्वे, अचलपूर, पूसद, अकोला
२. विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था, अमरावती, यवतमाळ, पूसद, चिखली, दारव्हा, दिग्रस, वणी, मारेगांव, उमरखेड, रिसोड, बुलढाणा, मेहकर, अकोला, अनसिंग वाशिम, धा.रेल्वे

विषय :- शैक्षणिक वर्ष २००८-२००९ मधील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी नंतरच्या अभियांत्रिकी पदविका आणि इतर तत्सम पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत.

संदर्भ :- मा.संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/पदविका/२००८/१७५५, दि.२१.६.२००८

उपरोक्त संदर्भिय विषयाला अनुसरुन कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००८-२००९ मधील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी नंतरच्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाचे सुधारित प्रवेश नियम संचालनालयाच्या www.dte.org.in या संकेत स्थळावर डाऊनलोड सेक्शनमध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने आपणांस सूचित करण्यात येते की ज्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २००८-२००९ करीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त आहे त्या संस्थांनी मान्यता मिळालेल्या प्रवेश क्षमतेनुसार प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश हे सुधारीत नियमानुसार करावेत.

तसेच इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचा अंतिम दिनांक (Cut off Date) १६ ऑगस्ट २००८ असा राहिल. शैक्षणिक वर्ष २००८-२००९ मधील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी नंतरच्या अभियांत्रिकी व इतर तत्सम पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक सोबत जोडले आहे. सदर वेळापत्रकाप्रमाणेच प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी. प्रवेश अर्जाची फी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये २००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये १००/- एवढी आकारण्यात यावी.

थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे नियम इयत्ता १० वी नंतरच्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमातील नियम क्रमांक १२.० अन्वये विहित केलेले आहेत. त्याप्रमाणे सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

सहपत्र:- वरिल प्रमाणे

सहसंचालक तंत्र शिक्षण,
अमरावती

प्रत:-

मा.संचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई यांना माहितीकरीता सादर

# सहसंचालक, तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
## शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-ati_jdroamt@Sancharnet.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५५१३८८


---

## वेळापत्रक

| अ.क्र | प्रवेश प्रक्रियेचा कार्यक्रम | कालावधी (दिनांक) |
|---|---|---|
| १. | प्रवेश अर्ज वितरण व स्विकृतीचा दिनांक | प्रवेश अर्ज वितरण व स्वीकृती इयत्ता दहावीचे निकालाचे दुस-या दिवसापासून |
| २. | प्रवेश अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | प्रवेश अर्ज वितरणाच्या दिनांकापासून १५ दिवस |
| ३. | तात्पूरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करण्याचा दिनांक | प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांका नंतर तीन दिवस |
| ४. | गुणवत्ता यादीतील तक्रारी संबंधी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | तात्पूरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करण्याचा दिनांकानंतर दोन दिवस |
| ५. | अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित करण्याचा दिनांक | गुणवत्ता यादीतील तक्रारी संबंधी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांकानंतर दोन दिवस |
| ६. | प्रवेश प्रक्रिया | अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित केल्याच्या दुस-या दिवसा पासून १० दिवसाच्या आंत |
| ७. | वर्ग सुरू होण्याचा दिनांक | अभियांत्रिकी :- दि.४.८.२००८<br>औषधनिर्माणशास्त्र :- दि.२१.७.२००८. |
| ८. | प्रवेश प्रक्रियेचा अंतिम दिनांक | १६ ऑगस्ट २००८ |

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती